# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३ / फाल्गुन २४, १९४४ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(३)** | **बंदरे, खनिकर्म मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २८**

---

**उंबरखेडे (ता.चाळीसगांव, जि.जळगांव) येथील गोदामात अनधिकृपणे ठेवलेला रेशनच्या तांदुळाचा साठा सापडल्याबाबत**

**(१) * ६२९८३ श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंबरखेडे (ता.चाळीसगांव, जि.जळगांव) येथे शासकीय धान्य साठवणुकीचा अथवा वाहतुकीचा कोणताही परवाना नसताना काळया बाजारात विक्रीच्या उद्देशाने ट्रक तसेच गोदामात साठा करुन ठेवलेला सुमारे ६ लाख ७० हजार १५० रुपये किंमतीच्या ७२९ गोण्या रेशनचा तांदुळ महसूल व पोलिसांच्या पथकाने पकडला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

दिनांक १६.१२.२०२२ रोजी सदरची कारवाई करण्यात आली आहे.

(२) सदर प्रकरणी मेहुणबारे पोलीस ठाणे, तालुका चाळीसगाव, जिल्हा जळगाव येथे दिनांक २०.१२.२०२२ रोजी गु.र.नं. २७६/२०२२, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५, कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात दोन आरोपींना अटक करण्यात आलेली असून पुढील तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यात विज पुरवठ्या अभावी पिकांचे होत असलेले नुकसान**

**(२) * ६२२९४ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यात सध्या गहु,कांदा, हरभरा, उन्हाळी मका आदि रब्बी पिके शेतात उभी आहेत परंतु विज पुरवठ्या अभावी पिकांना पाणी देता येत नसल्याने पिकांचे नुकसान झाले असल्याचे माहे फेब्रुवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विहिरीना मुबलक प्रमाणात पाणी साठा असतांना विज पुरवठ्याअभावी पिके धोक्यात येत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दड सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मालेगांव तालुक्यातील (जि.नाशिक) अजंग (उपकेंद्र) येथील महावितरण कंपनी कार्यालयाबाहेर स्थानिक शेतकऱ्यांनी दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास ठिय्या आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, संतप्त शेतक-यांनी उपकेंद्रावर आंदोलन करुन जोपर्यंत ठोस निर्णय होत नाही तोपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा निर्देशानुसार कृषी वाहिन्यांवरील कृषीपंपांना दिवसा ८ तास व रात्री ८ तास वीजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने करण्यात येते. मालेगांव विभागातील कृषीपंपांना ८९ कृषी वाहिन्यांव्दारे वीज पुरवठा करण्यात येतो. माहे जानेवारी २०२३ मध्ये मालेगांव विभागात ०५ कृषी वाहिन्यांवरील वीज पुरवठा सरासरी ८ तास व माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये ०७ कृषी वाहिन्यांवरील वीज पुरवठा सरासरी ०५ तास तांत्रिक बिघाडामुळे खंडीत होता. तसेच माहे जानेवारी २०२३ मध्ये १४ कृषी वाहिन्यांवरील वीज पुरवठा सरासरी ०३ तास ४७ मिनिट व माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये १३ वाहिन्यांवरील वीज पुरवठा सरासरी ०३ तास ४७ मिनिटे व माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये १३ वाहिन्यांवरील वीज पुरवठा सरासरी ०४ तास ३४ मिनिटे प्रतिबांधत्मक देखभाल व दुरुस्तीसाठी खंडीत होता.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) रब्बी हंगामात कृषी वाहिन्यांमधील भार वाढून महत्तम मागणीच्या कालावधीत काही वेळेसाठी सदर वाहिन्या अतिभारीत होतात व तांत्रिक बिघाडामुळे वीजपुरवठा खंडित होतो. सदर तांत्रिक बिघाड दूर करुन, नादुरुस्त रोहित्र बदली करुन वीज पुरवठा कमीत कमी वेळेत पूर्ववत करण्यात येतो. अजंग उपकेंद्राची स्थापित क्षमता १० एमव्हीए (२x५ एमव्हीए) असून तेथील अतिभारीत वाहिन्यांवरील भार कमी होण्यासाठी उच्चदाब वितरण प्रणाली (HVDS) अंतर्गत अतिरिक्त ५ एम. व्ही. ए. क्षमतेचे ऊर्जा रोहित्र बसविण्याचे काम प्रगतीपथावर असून मार्च २०२३ अखेरीस पूर्ण करण्याचे नियोजित आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर स्थानिक वीज ग्राहकांचा वीजपुरवठा अधिक सुरळीतपणे होण्यास मदत होईल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुरजागड (जि.गडचिरोली) येथील गडचिरोली मेटल ॲन्ड मिनरल्स कंपनीच्या कॅप्टीव्ह प्लांन्टचा दर्जा बदलल्याबाबत

**(३)** * **६२१०९ श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुरजागड (जि.गडचिरोली) येथील गडचिरोली मेटल्स ॲन्ड मिनरल्स कंपनीच्या नावाने वाटप करण्यात आलेल्या कॅप्टीव्ह प्लॉन्टचा दर्जा बदलण्यात आल्याने शासनाचे १० हजार कोटी रूपयांचे नुकसान झाले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली जिल्हयातील सूरजागड लोहखनिजाची खाण सर्वप्रथम गडचिरोली मेटल्स ॲन्ड मिनरल्स कंपनीला कॅप्टीव्ह खाण म्हणून देण्यात आली ज्यामध्ये गडचिरोलीत स्टील प्लॉन्ट उभारण्याची महत्वाची अट असतांनाही कंपनीने सदर अटीचे पालन न करता ३४८.०९ हेक्टरची ही खाण लॉयड मेटल्स ॲन्ड एनर्जी लिमिटेड घुग्घुसकडे दिली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनातर्फे चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीअंती शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**पुणे शहर पोलिसांच्या हद्दीत मालवाहतूक करणाऱ्या हायवा गाड्यांची झालेली चोरी**

**(४)** * **६२८८२ श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर पोलीसांच्या हद्दीत मालवाहतुक करणाऱ्या दोन हायवा गाड्या लोणीकंद पोलीस स्टेशनाच्या हद्दीतुन चोरीला गेल्याचे माहे डिसेंबर, २०२२ वा जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या गाड्या औरंगाबाद जिल्ह्यात नेऊन भंगारात काढल्या असल्याचे हे पोलीस तपासात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बेरोजगार तरुणांनी व्यवसायासाठी कर्जावर घेतलेल्या गाड्या औरंगाबाद जिल्ह्यात नेऊन भंगारात काढल्याने तरुणांवर कर्जामुळे आत्महत्या करण्याची वेळ आली आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, औरंगाबाद जिल्ह्यामध्ये इतर ठिकाणाहुन मालवाहतूक करणाऱ्या हायवा गाड्या चोरून नेऊन त्या तोडून भंगारात विकण्याचा राजरोसपणे मोठ्या प्रमाणात व्यवसाय चालू आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने संबधित गुन्हेगारांवर कोणती कारवाई करण्यात आली तसेच गाड्या चोरीचे प्रकार रोखण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस आयुक्तालय, पुणे शहर अंतर्गत लोणीकंद पोलीस ठाणे हद्दीमध्ये माहे डिसेंबर, २०२२ मध्ये एक व माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये एक मालवाहतूक हायवा गाडी चोरीला गेल्याबाबत लोणीकंद पोलीस स्टेशन येथे अनुक्रमे दिनांक २३.१२.२०२२ रोजी गु.र.क्र. ७१७/२०२२ व दिनांक ०५.०२.२०२३ रोजी गु.र.क्र. ११०/२०२३ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(२) उपरोक्त पैकी लोणीकंद पोलीस ठाणे येथे दाखल गु. र. क्र. ११०/२०२३ या गुन्ह्यामध्ये नमूद हायवा गाडी जालना जिल्ह्यामधून ताब्यात घेण्यात आली असून सदरची गाडी तोडण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे आणि गु.र.क्र. ७१७/२०२२ मध्ये चोरीस गेलेली हायवा गाडी अद्याप मिळून आली नाही.
(३) व (४) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(५) सदर प्रकरणी लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर गु.रं.नं. ७१७/२०२२ भा.दं.वि. ३७९, ४११, ४१३, २०१, ३४ व लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर गु.र.नं. ११०/२०२३ भा.दं.वि. ३७९,४११,२०१,३४ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यांमध्ये एकूण दोन आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्यांचा तपास सुरू आहे. तसेच गाड्या चोरीचे प्रकार रोखण्याच्या दृष्टीने अचानक नाकाबंदी करून वाहनांची, कागदपत्रांची तपासणी, विशेष पेट्रोलिंग, कोंबींग ऑपरेशन इ. कार्यवाही केली जाते.
(६) प्रश्न उद्‍भवत नाही.

----------------

## मुंबईतील एफ/उत्तर येथील सदगुरु झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण प्रकल्पात मंजुर आराखड्याप्रमाणे विकासक मे. न्यु लुक कन्स्ट्रक्शन यांनी बांधकाम केले नसल्याबाबत

**(५) * ६०९८३ श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एफ/उत्तर विभागातील प्लॉट नं ८९ (भाग) या भूखंडावरील सदगुरु झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण प्रकल्पात मंजूर आराखडयाप्रमाणे विकासक मे.न्यु.लुक कन्स्ट्रक्शन यांनी बांधकाम केले नसल्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास भोगवटा प्रमाणपत्र रद्द केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकाने मंजुर आराखडयाप्रमाणे बांधकाम केले नसल्यास विकासकावर तातडीने कारवाई करावी अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे कडे दिनांक २४ जानेवारी २०२३ रोजी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करुन विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत सदर योजनेच्या पहाणीनंतर योजनेतील पुनर्वसन इमारतीचे काम मंजूर आराखड्याप्रमाणे झालेले नसल्याने सदर बांधकामास दि.२३ डिसेंबर, २०२२ रोजी काम थांबवा आदेश (Stop work Notice) देण्यात आलेले आहेत. तसेच विक्री घटकातील इमारतीस देण्यात आलेले अंशत: भोगवटा प्रमाणपत्र रद्द करण्यात आलेले आहे. सदर योजनेचे वास्तुविशारद व विकासक यांना सदर योजनेतील इमारतीचे बांधकाम मंजूर आराखड्याप्रमाणे पूर्ववत होईपर्यंत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत कोणत्याही प्रकारची बांधकाम परवानगी देण्यात येणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येरवडा (जि.पुणे) बालसुधारगृहातुन आठ मुलांनी पलायन केल्याबाबत

**(६) * ६२०३१ श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा (जि.पुणे) येथील बाल सुधारगृहातुन दिवसा आठ विधी संघर्षग्रस्त मुले पळून गेली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पळून गेलेल्या अल्पवयीन मुलांवर खून, खुनाचा प्रयत्न करणे, घरफोडी यासारखे गंभीर गुन्हे नोंद आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु मुले कुप्रसिद्ध कोयता गॅंगचे सदस्य असल्याची शंका असून याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, राज्यभरात विशेषतः पुणे शहरात वेगाने वाढणाऱ्या बाल गुन्हेगारीचे प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) होय, हे खरे आहे.

संस्थेमधून पळून गेलेल्या ८ मुलांपैकी ७ मुलांना संस्थेत पुन:श्च दाखल करण्यात आले असून एका मुलाचा पोलीसांकडून तपास सुरु आहे.

(२) होय, हे खरे आहे,

(३) हे खरे नाही.

पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत कोयता गॅंग म्हणून कोणतीही गॅंग अस्तित्वात नाही.

(४) विधीसंघर्षग्रस्त बालक पुन्हा गुन्हे करु नये, म्हणून पोलीस स्टेशन स्तरावर विधीसंघर्षग्रस्त बालक व त्यांच्या पालकांना समुपदेशन केले जाते. गुन्हा करण्यामागचे कारण समजून घेऊन त्यांना गुन्हा करण्यापासून परावृत्त करून, त्यांना मूळ प्रवाहात आणण्याकरिता त्यांच्या पालकांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले जाते. त्याकरिता स्वयंसेवी संस्थांची (एन.जी.ओ.) मदत घेतली जाते. गुन्हेगारीच्या दुष्परिणामांबाबत त्यांना सांगितले जाते.

जे मुले-मुली (१८ वर्षांच्या आतील) त्यांच्या आई- वडिलांचे ऐकत नाहीत, वाईट व्यसने, सवयींना बळी पडलेले आहेत, अशा मुलांना त्यांचे पालक समुपदेशनाकरिता भरोसा सेल कार्यालयात घेऊन येतात. अशा मुलांचे कार्यालयामध्ये समुपदेशन करुन, त्यांना शिक्षणाचे महत्व, व्यसनाधिनतेमुळे होणारे नुकसान याबाबत मार्गदर्शन केले जाते.

सन २०२२ मध्ये १६० व जानेवारी २०२३ ते फेब्रुवारी २०२३ पर्यंत १२८ विधीसंघर्षग्रस्त बालकांचे समुपदेशन करण्यात आलेले असून १५ विधीसंघर्षग्रस्त बालकांना कौशल्य विकास प्रशिक्षण (३ महिन्यांचे व्होकेशनल कोर्स) देऊन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे.

संस्था व संस्था परिसरामध्ये बालकांची काळजी व संरक्षणाच्या दृष्टिकोनातून राज्यातील संवेदनशील निवासी संस्थांमध्ये सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांच्याकडून सुरक्षा सेवा घेण्याच्या अनुषंगाने १०६ संस्थांचा सुरक्षा आढावा (Security Audit) घेण्यात आला असून सुरक्षा आढाव्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येस बँकेच्या ३९ रिटेलर्सने ग्राहकांची रक्कम परस्पर काढून केलेला गैरव्यवहार

**(७) * ५९७१३ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येस बॅंकेच्या ३९ रिटेलर्स ने ग्राहकांची एक कोटी १८ लाख रुपयांची रक्कम परस्पर काढून अपहार केल्याप्रकरणी येस बॅंकेने रिटेलर्स विरोधात वाशी पोलीस ठाण्यात (नवी मुंबई) येथे दिनांक १० जानेवरी, २०२३ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधिताविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच गैरव्यवहाराची रक्कम मूळ ग्राहकांच्या खात्यात जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) सदर प्रकरणी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाणे, वाशी येथे एकूण ४८ आरोपीतांविरुद्ध गु.र.क्र. १५/२०२३ भा.द.वि. कलम ४२०, ३४ सह आय.टी. ॲक्ट कलम ६६ डी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे. सदर तपासामध्ये व्ही. के. व्हेंचर्स प्रा.लि., वाशी, नवी मुंबई ही कंपनी रिटेलर्सच्या माध्यमातून आधार एनेबेल्ड पेमेंट सिस्टीमद्वारे संगणकीय साधनांचा वापर करून ग्राहकांना मनी ट्रान्सफर, आधार कार्ड वरून पैसे काढणे, मोबाईल रिचार्ज करणे, बील पेमेंट व इतर अशा सेवा देते. येस बॅंक व फिन पे हे व्ही. के. व्हेंचर्स प्रा.लि., या कंपनीचे सर्व्हिस प्रोव्हायडर असल्याचे निष्पन्न झाले आहे.

व्ही. के. व्हेंचर्स प्रा.लि., या कंपनीमध्ये नोंदणीकृत असलेल्या ४८ रिटेलर्सनी संगणकीय साधनांद्वारे ग्राहकांच्या आधारकार्ड व फिंगरप्रिंट्सचा गैरवापर करून ग्राहकांच्या वेगवेगळया बॅंक खात्यामधून एकूण रु.१,३७,४८,७५३/- काढून घेतले आहेत.

(४) रिटेलर्स आरोपींनी ज्या ग्राहकांच्या बँक खात्यामधून परस्पर रक्कम काढून घेतली त्या ग्राहकांनी त्यांच्या बँकांमार्फत नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एन.पी.सी.आय.) या प्राधिकरणाकडे तक्रार केल्यानंतर व्ही.के. व्हेंचर्स प्रा.लि. कंपनीने संबंधीत ग्राहकांच्या खात्यामध्ये एकूण रु. ६०,००,५४७/- परत केले आहेत. पुढील तपास सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महावितरणाच्या ग्राहकांची बनावट संदेशाद्वारे होणारी फसवणुक**

**(८) * ६१९६४ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महावितरणच्या विज ग्राहकांची बनावट संदेशाद्वारे ऑनलाईन देयक भरण्याबाबत फसवणूक होत असल्याच्या घटनामंध्ये वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज ग्राहकांनी अनोळखी क्रमांकावरून येणाऱ्या लघु संदेशांना बळी पडू नये असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांनी केले आहे, हे ही खरे काय,
(३) असल्यास, महावितरणच्या वीज ग्राहकांचा रजिस्टर मोबाईल नंबरचा डेटा लीक झाल्यामुळेच ऑनलाईन देयकाबाबत बनावट संदेश पाठविण्यात येत असल्याप्रकरणी तसेच सदर डेटा लिक होत असल्याबाबत संबंधितांवर फौजदारी व प्रशासकीय स्वरूपाची कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महावितरणच्या विज ग्राहकांची बनावट मेसेजद्वारा ऑनलाईन बिल भरण्याबाबत फसवणूक होत असल्याबाबत राज्यामध्ये ९५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(२) हे खरे आहे. दि.१९.०१.२०२३ रोजी प्रेस नोटद्वारे महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांनी बनावट संदेशाद्वारे फसवणूक करणाऱ्या संदेशाला प्रतिसाद न देण्याचे आवाहन केले आहे.
(३) हे खरे नाही. सदर बनावट लघु संदेश महावितरणकडे नोंदणीकृत असलेले किंवा नसलेले मोबाईल क्रमांकावर येत असल्याचे निदर्शनास येत आहे. सदर प्रकारच्या संदेशामध्ये ग्राहकाचा वैयक्तिक तथा वीज बिलासंबंधी तपशील आढळून येत नाही. तसेच, सदर बनावट संदेश महावितरणच्या ग्राहकांना व इतरही वीज कंपन्यातील (अदानी, टाटा पॉवर, बेस्ट ई.) ग्राहकांना देखील येत असल्याचे विविध वृत्तपत्रातील बातम्यांद्वारे निदर्शनास आले आहे. सबब, महावितरणचा कोणताही डेटा लीक झालेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अहमदनगर-सोलापूर रोडवरील रुईछत्तीसी शिवारात बंदी असलेला मांगूर माशाची वाहतूक करणारा कंटेनर स्थानिक गुन्हे शाखेने पकडल्याबाबत**

**(९) * ५९२६६ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर-सोलापूर रोडवरील रुईछत्तीसी शिवारात बंदी असलेल्या मांगूर माशाची वाहतूक करणारा कंटेनर स्थानिक गुन्हे शाखेने पकडल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्यास घातक असलेला सुमारे २८ लाख रुपये किंमतीचे साडेपाच टन मांगूर मासे खड्डा खोदून नष्ट करण्यात आले असून, या प्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय.

मांगूर जातीच्या माशांचे संवर्धन, वाहतूक व विक्रीवर बंदी असताना वाहतूक करताना आढळून आल्याने नगर पोलीस ठाणे, अहमदनगर येथे गु.र.क्र.८८५/२०२२, भारतीय दंड संहिता कलम १८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईच्या सागरी सुरक्षेसाठी तैनात करण्यात आलेल्या आधुनिक बोटींच्या दुरुस्तीबाबत**

**(१०) * ५८८६४ श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहशतवादी २६/११ च्या हल्ल्यानंतर मुंबईच्या सागरी सुरक्षेसाठी आधुनिक बोटी आणि सागरी पोलीस ठाणे उभारण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गस्ती बोटींची देखभाल व दुरुस्ती होत नसल्यामुळे १२ बोटी भाडेतत्वावर घेण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सागरी सुरक्षेसाठी खाजगी बोटी घेणे धोक्याचे असल्यामुळे मुंबईतच देखभाल व दुरुस्ती वेळेवर होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सद्य:स्थितीत किती बोटी नादुरुस्त आहेत व किती बोटी भाडेतत्वावर घेण्यात आल्या असुन त्यांची दुरुस्ती कधीपर्यंत पूर्ण होणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई पोलीस दलाकडे अस्तित्वात असलेल्या बोटींची देखभाल व दुरुस्ती नियमितपणे होत असून गस्त वाढविण्याकरीता ८ खाजगी ट्रॉलर्स भाडेतत्वावर उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

(३) शासकीय बोटींची देखभाल व दुरुस्ती मोटर परिवहन विभागाच्या अखत्यारितील कार्यालयात होत आहे. तसेच त्या ठिकाणी नौका विभागाकरिता आधुनिक कार्यशाळा व जेट्टी बांधणे प्रस्तावित आहे. तसेच सागरी सुरक्षेबाबत आढावा घेण्यात आला असून नवीन बोटी खरेदी करणेसुध्दा प्रस्तावित आहे.

(४) व (५) सद्यस्थितीत बृहन्मुंबई पोलीस दलाकडे एकूण २३ बोटी असून त्यापैकी ११ बोटी इंजिन निर्मिती बंद झाल्यामुळे सुटे भाग मिळत नसल्याच्या कारणामुळे नादुरुस्त आहेत. इंजिन निर्मिती बंद झाल्यामुळे नादुरुस्त बोटीपैकी एका बोटीचे आधुनिकीकरण करण्यास प्रायोगिक तत्वावर मान्यता देण्यात आली असून, ते यशस्वी झाल्यास अन्य बोटींचे आधुनिकीकरण प्रस्तावित आहे. इतर ०२ नादुरुस्त बोटी यांच्या दुरुस्तीची प्रक्रिया सुरु आहे. दरम्यान सागरी गस्त वाढविण्याकरीता ०८ बोटी भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**दादर (मुंबई) येथील छप्रा, मोहसीन इमारत, गोरेगावकर प्रिमायसेस,**
**आर.के. या इमारतींच्या प्रलंबित कामांबाबत**

**(११) * ६२०५३ श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर, मुंबई येथील छप्रा, मोहसीन इमारत, गोरेगावकर प्रिमायसेस व आर.के. या इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकासकाला म्हाडाकडून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतींचे काम प्रलंबित असून विकासकाने भाडेकरुंना मागील ५ ते ९ वर्षे तात्पुरत्या संक्रमण शिबिराचे भाडे देणे बंद केले आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रहिवाश्यांना संक्रमण शिबीराच्या भाड्याची रक्कम मिळण्याबाबत व पुनर्विकासाचा प्रकल्प पुर्ण करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) छप्रा व मोहसीन या मालमत्तेचे अर्धवट अवस्थेत सोडलेल्या पुनर्विकास प्रकल्पाचे ना-हरकत प्रमाणपत्रधारक यांनी अन्य विकासकास सदर मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी कुलमुखत्यारपत्र पंजिकृत करुन दिले असून त्यानुसार मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत नवीन विकासकास अर्धवट अवस्थेत सोडलेले काम पुर्ण करण्यासाठी सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. नवीन विकासक व सदरहू प्रकल्पातील भाडेकरु / रहिवाशी यांच्यावतीने वकीलासोबत झालेल्या सामंजस्य करारानुसार (MOU) रहिवाशी / भाडेकरुंचे थकीत भाडे महानगरपालिकेने प्रकल्पाचे उर्वरीत काम प्रत्यक्ष सुरु करण्यास परवानगी दिल्यानंतर नवीन विकासकामार्फत हप्त्याने देण्यात येणार आहे व यास भाडेकरु/रहिवाश्यांनी मान्यता दिली आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ मध्ये दि.०२.१२.२०२२ रोजीच्या अधिसूचनेन्वये सुधारणा केल्या असुन, त्यानुसार मुंबई शहरातील विविध कारणांमुळे अपुर्ण राहिलेले/सोडलेले उपकरप्राप्त इमारतींचे पुनर्विकास प्रकल्प म्हाडामार्फत ताब्यात घेऊन पुर्नविकास करण्यात येणार आहे. सुधारीत तरतूदींनुसार गोरेगावकर प्रिमायसेसचे मालक / विकासक तसेच आर.के. बिल्डींगचे मालक / विकासक यांनी अर्धवट अवस्थेत सोडलेले प्रकल्प म्हाडामार्फत भूसंपादित करुन पुर्ण करण्याची कार्यवाही करण्यासाठी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत नोटीस बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे काराव (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील मे.डिम्पल चड्डा डेव्हलपर्स**
**ॲन्ड प्रमोटर्स यांनी केलेला गैरव्यवहार**

**(१२) * ६२८४२ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे काराव (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथे मे.डिम्पल चड्डा डेव्हलपर्स ॲन्ड प्रमोटर्स यांच्याकडून सार्वजनिक व खाजगी विकासक भागीदारी तत्वावर गरीब व दुर्बल मध्यम उत्पन्न घटकांना स्वस्त दरात घरे देणे तसेच घरकुल योजनेतंर्गत च्या घरकुल योजनेस पिण्याचे पाणी उल्हासनदीतून देत असताना पाणी आरक्षण मंजूर नसुनही पाण्याची लाईन टाकण्यासाठी रस्त्याचे खोदकाम करताना सार्वजनिक बांधकाम विभागाची ही परवानगी घेतली नसल्याने उल्हासनगर बांधकाम उपविभागाने या विकासकावर सन २०२२ मध्ये वा त्यादरम्यान कुळगाव पोलीस स्टेशन ला गुन्हा दाखल केला आहे, हेखरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले, तदनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेसह शासनाची फसवणूक केल्याबाबत मे.डिम्पल चड्डा डेव्हलपर्स ॲन्ड प्रमोटर्सवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ग्रुप ग्रामपंचायत काराव ता. अंबरनाथ, जि. ठाणे यांच्या दिनांक ०५/०१/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जान्वये मे. चड्डा डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर्स यांनी ग्रामपंचायतीची परवानगी न घेता गावठाण तसेच खाजगी जागेमध्ये खोदकाम करुन रस्ते तसेच मालमत्तेचे नुकसान केल्याबाबत त्यांचेविरुद्ध कारवाई करणेबाबत तक्रार केलेली होती. तथापि, याबाबत कुळगांव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल नाही.
(२) व (३) सदर प्रकरणी मे.चड्डा डेव्हलपर्स ॲन्ड प्रमोटर्स यांना ग्रामपंचायत काराव यांचेमार्फत लेखी नोटीसद्वारे पाईप लाईन खोदाईकामी व इतर संबंधीत परवानगीबाबत कागदपत्रांची मागणी केली होती, त्याप्रमाणे नोटीसीचे उत्तर म्हणुन मागणी केलेली पाईप लाईन खोदाईबाबतचे परवानगीबाबतची कागदपत्रके ग्रामपंचायतीकडे सादर केली असल्याने ग्रामपंचायती तक्रार राहिली नसल्याचे ग्रामपंचायतीच्या वतीने जबाब देण्यात आला आहे. सबब, सदरचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धानोरा (जि.जळगाव) येथे १३२ के.व्ही. स्टेशनच्या कामाचे कार्यारंभ प्राप्त होऊनही कामास सुरुवात झालेली नसल्याबाबत

**(१३)** * **६२४३२ श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धानोरा (ता.चोपडा, जि.जळगांव) येथे १३२ के.व्ही. स्टेशनचे काम मंजूर करण्यात आले असून सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि.०१ एप्रिल, २०२२ रोजी काढण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाचे कार्यारंभ प्राप्त होऊन जवळपास १० महिन्यांचा कालावधी होऊनही संबंधित कंत्राटदाराकडून कामास सुरुवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे या भागातील शेतकऱ्यांना कमी दाबाने विदयुत पुरवठा होत असल्याने सिंचना अभावी शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत धानोरा येथील १३२ के.व्ही. स्टेशनचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मा.उपमुख्यमंत्री महोदय यांच्याकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
तथापि सद्यस्थितीत दिनांक २४.०१.२०२३ पासून काम सुरु आहे.
(३) चोपडा व यावल या तालुक्यातील परिसर हा कृषी बहुल असून रबी हंगामात उच्चत्तम मागणीच्या काळात काही वेळा ३३/११ के.व्ही. धानोरा, चिंचोळी, किनगांव या उपकेंद्रातून वीज पुरवठा करणाऱ्या ११ के.व्ही. कृषी वाहिन्या अतिभारीत होतात. तथापि, त्यावेळी उपकेंद्रातील रोहित्रांवर उपलब्ध टॅपचेंजिंग प्रणाली व कॅपेसिटर बँक कार्यान्वित करुन योग्य दाबाने वीज पुरवठा सूरळीत ठेवण्यात येतो. भविष्यात चोपडा तालुक्यातील सर्व संवर्गातील वीज ग्राहकांना योग्य दाबाने गुणवंतापुर्वक अखंडित वीज पुरवठा करणे आवश्यक व्हावे त्यासाठी धानोरा (ता.चोपडा, जि. जळगाव) येथे नविन अतिउच्च दाब २x५० एमव्हीए क्षमतेच्या उपकेंद्राच्या उभारणीचे काम महापारेषण कंपनी करित आहे.
(४) निवेदन प्राप्त झालेले नाही.
(५) व (६) सदरच्या कामास दि.२४.०१.२०२३ पासून सुरवात केली आहे.

-----------------

## दक्षिण सोलापूर तालुक्यात महावितरणच्या ठरलेल्या कंत्राटदाराकडून केलेली कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(१४) * ५७९६४ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर तालुक्यात महावितरणच्या ठरलेल्या कंत्राटदारांकडून केली जाणारी दुरुस्तीची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी सब स्टेशनचे काम एका कंत्राटदारास तर एलटी व ११ केव्ही एचपी लाईटच्या देखभालीचे काम दुसऱ्या कंत्राटदारास तर ट्रान्सफॉर्म बसवणे व त्या ट्रान्सफॉर्मरची देखभाल दुरुस्तीची कामे तिसऱ्या कंत्राटदारास देण्यात येत असल्याने या कामांमध्ये योग्य समन्वय नसून कामाच्या गुणवत्तेवर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाकलेले पोल सरळ करणे, झाडे तोडणे, लोंबकळलेल्या अथवा तुटलेल्या विद्युत तारा नीट करणे, केबल बदलणे, ट्रान्सफॉर्मरच्या ठिकाणी किटकॅटची पेटी कुलपबंद अवस्थेत ठेवणे तसेच विदयुत प्रवाह सुरू असलेल्या डब्याला दरवाजावर कुलूप नसणे इत्यादी त्रुटी असतानाही अशा त्रुटींची महावितरणकडून कोणतीही तपासणी करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, या कंत्राटदारांची देयके महावितरणकडून अदा केली जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

दि.०५.१२.२०२२ रोजी दैनिक पुढारी या वृत्तपत्रामध्ये "महावितरण कंत्राटदाराकडून मेंटेनन्सची कामे बोगस" या मथळयाखाली बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) हे खरे नाही.

महावितरण कंपनीच्या धोरणानुसार उपकेंद्र देखभाल दुरुस्तीची कामे, उच्च व लघुदाब वाहिनीच्या देखभाल दुरुस्तीचे कामे व नादुरुस्त वितरण रोहित्रे दुरुस्त करणे व बदलून देणे या तीन वेगवेगळया कामांकरीता विभागीय स्तरावर निविदा प्रक्रियाव्दारे निवडलेल्या सुचिबध्द (Empanelled) कंत्राटदारांकडून कामे करण्यात येत आहेत. यामुळे, महावितरणला सदर कामांसाठी आवश्यक अनुभव असलेले व कुशल कंत्राटदार उपलब्ध होतात. सदर कामांचे स्वरुप वेगवेगळे असल्याने प्रत्येक कंत्राटदार आवश्यकतेनुसार स्वतंत्ररित्या काम करीत असतो.

(३) हे खरे नाही.

देखभाल व दुरुस्तीच्या कामांबाबत स्थापन केलेल्या चौकशी समिती मार्फत दक्षिण सोलापूर तालुकांतर्गत सोलापूर ग्रामीण-२ उपविभागामध्ये येणाऱ्या गावांमध्ये सूचिबध्द कंत्राटदारांनी केलेल्या वेगवेगळया देखभाल दुरुस्तीच्या कामांची नमुना तपासणी केली आहे. कंत्राटदाराने सादर केलेल्या देयकातील कामांच्या नमुना तपासणी दरम्यान विद्युत तारा बदलणे, झोळ आलेल्या विद्युत तारा ओढणे, जंपर बदलणे, पोल बदलणे, झाडाच्या फांद्या तोडणे इ. कामे करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, कंत्राटदाराने सादर केलेल्या देयकाप्रमाणे PSC पोलला मफींग व काँक्रेटींगची कामे काही ठिकाणी झाली नसल्याचे चौकशी समितीच्या निदर्शनास आले आहे.

(४) व (५) दि. ०५.१२.२०२२ रोजी दैनिक पुढारी या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने महावितरणच्या क्षेत्रिय कार्यालयाने चौकशी समिती नेमून वृत्तपत्रातील मुद्यांबाबत चौकशी केली आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यामध्ये देखभाल व दुरुस्तीच्या काही कामांमध्ये ५ ठेकेदार दोषी आढळलेले आहेत. सदर कंत्राटदारांना एकूण

रु.१२,३१,५५४ इतका दंड लावण्यात आला असून त्यापैकी रु.७,९८,८२८ इतका दंड वसूल करण्यात आला आहे. उर्वरित रु.४,३२,७२६ इतका दंड वसूल करणे प्रक्रियेधीन आहे. तसेच, दोषी आढळलेल्या अभियंत्यांवर कारणे दाखवा नोटीस बजावून कारवाईची पुढील प्रक्रिया सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भरणे (ता. खेड, जि.रत्नागिरी) येथे व्हेल माशाची उलटी (अंबरग्रीस) जप्त केल्याबाबत**

**(१५) * ५८८९३ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भरणे (ता. खेड, जि.रत्नागिरी) येथे व्हेल माशाची उलटी (अंबरग्रीस) जप्त करून तीन जणांना दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्हेल माशाची उलटी (अंबरग्रीस) ही त्यांना मासेमारी करत असताना मिळाली असून त्यांनी तो माशाचा प्रकार म्हणून विक्री करण्यास आणला असता या तिघांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियमाप्रमाणे गुन्हा नोंद करून अटक करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्याअनुषंगाने निष्पाप मच्छीमारांवर अटकेची कारवाई करण्यात येवू नये, यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ मधील शेडयुल २ मधील भाग २ मध्ये स्पर्म व्हेल ही संरक्षित प्रजाती आहे व त्या प्रजातीच्या माशाची उलटी (अंबरग्रीस) ची वाहतुक, विक्री करणे, व बाळगणे दखलपात्र अपराध आहे.

सदर प्रकरणी उपरोक्त अधिनियमान्वये, व्यापारास मनाई असलेल्या व्हेल माशाच्या उलटीची (अंबरग्रीस) विक्री करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीरपणे स्वतःच्या ताब्यात बाळगल्याबद्दल चार आरोपींविरुद्ध पोलीस ठाणे, खेड (जि. रत्नागिरी) येथे गु.र.नं. ०९/२०२३ वन्यजीव (संरक्षण) अधिनियम - १९७२ चे कलम - २ (१६), ३९, ४० (२), ४४ (१), ४८ (ए) (१), ४९, ४९ (बी), ५१, ५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात चार आरोपी निष्पन्न झाले असून अन्य एका आरोपीचा शोध सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चांदोली(ता.शिराळा, जि.सांगली) येथील प्रकल्पग्रस्तांना शासनाने पाठविलेल्या नोटीसीबाबत**

**(१६) * ६१५७८ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) येथील वारणा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात असलेल्या गावांचे आणि लगतच्या अभयारण्य क्षेत्रातील बाधीत गावांचे सन १९८६ आणि १९९७ मध्ये सांगली आणि कोल्हापूर जिल्हयातील विविध भागांत पुनर्वसन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने पुनर्वसन केलेल्या ठिकाणी दिलेली जमीन नापीक तसेच पडीक असून शासनस्तरावर नोकरीसाठी आरक्षण स्थिर नसल्यामुळे धरणग्रस्त रोज शेतमजूरीला जात असल्याचे दनिांक २२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या धरणग्रस्तांना संपादित केलेल्या जमिनीच्या सात-बारावरील कब्जेपट्टीच्या रकमेबाबत शासनाने नव्याने लाखो रुपये भरणा करण्याबाबतच्या नोटीसी बजावण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना ४० वर्षानंतर शासनाने नोटीसा पाठविण्याऐवजी धरणग्रस्तांना प्रलंबित असलेली २३० हेक्टर जमीन वाटप, अभयारण्यग्रस्तांचे प्रलंबित ४३२ हेक्टर जमिन वाटप व धरणग्रस्त खातेधारकांचे शासकीय कार्यालय संकलन रजिस्टर दुरुस्तीसाठी प्रलंबित असलेले ६५० अर्जाबाबत प्रथम कार्यवाही करावी व शासनाच्या नोटीसा रद्द करण्यात यावी अशी मागणी प्रकल्पग्रस्तांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) वारणा प्रकल्प व चांदोली अभयारण्य यामधील शिल्लक प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटप करणे, कब्जेहक्काची रक्कम माफ करावी व प्रकल्पग्रस्तांचे संकलन अद्यावत करण्याची मागणी प्रकल्पग्रस्तांनी केली आहे.

(५) प्रकल्पग्रस्तांकडून प्राप्त होणाऱ्या पर्यायी जमिन मागणीबाबतच्या अर्जाच्या अनुषंगाने पर्यायी जमिन वाटपा बाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच चांदोली अभयारण्यासाठी लाभक्षेत्र नसल्याने वारणा प्रकल्पातील लाभक्षेत्रात संपादीत जमिनी चांदोली अभयारण्यग्रस्तांना वाटप करण्यात आल्या आहेत. तसेच उर्वरित चांदोली अभयारण्यग्रस्तांना पर्यायी जमिनी ऐवजी रोख रक्कम देणेबाबतच्या प्रस्तावासंदर्भात वन विभागामार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

सांगली जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रकल्पग्रस्तांचे संकलन दुरुस्तीसाठी ५९६ अर्ज प्राप्त झाले होते त्यापैकी ४४६ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. तसेच उर्वरित १५० अर्जाबाबत संबंधित तहसिल कार्यालयाकडून अहवाल मागविण्यात आला असून त्यापैकी अहवाल प्राप्त झालेल्या ३० प्रकरणी पडताळणी करुन आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## जालना जिल्ह्यामध्ये मे.भारत इलेक्ट्रिकल , सांगली या एजन्सीने काम न करता देयक काढल्याबाबत

**(१७) * ६२५३८ श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यामध्ये मे.भारत इलेक्ट्रिकल सांगली या एजन्सीला सन २०१८ ते सन २०२० या कालावधीत कामे न करता देयके अदा करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी झाली नसून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास अभियंता, पायाभूत आराखडा, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., औरंगाबाद यांना निवेदन देऊन चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधीत कामात एजन्सीने गावठाण फिडर आणि गावठाण लाईनचे काम हे निकृष्ट दर्जाचे केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहु प्रकरणी दोषी असणाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

जालना जिल्हयामध्ये मे. भारत इलेक्ट्रिकल सांगली या एजन्सीला दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत वाहिनी विलगीकरण व इतर कामे देण्यात आली होती. सद्यस्थितीत दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना मे, २०२२ मध्ये पूर्ण झालेली असून, सदर योजनेचा पुर्णत्वाचा अहवाल आरईसी, भारत सरकार यांना पाठविण्यात आलेला आहे. सदर योजनेअंतर्गत मे. भारत इलेक्ट्रिकल सांगली यांनी पूर्ण केलेल्या कामाचे बिल अदा करण्यात आले आहे व पूर्ण न झालेल्या कामाचे कोणतेही पैसे अदा करण्यात आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दि.१२.१२.२०२० च्या पत्रानुसार सहव्यवस्थापकीय संचालक, औरंगाबाद यांना मे. भारत इलेक्ट्रिकल सांगली यांनी जालना जिल्हयामध्ये केलेल्या कामाची चौकशी करणेबाबत मागणी केलेली होती. त्यानुसार सहव्यवस्थापकीय संचालक, औरंगाबाद यांनी चौकशी समिती गठीत करुन चौकशी केलेली आहे.

(३) हे खरे नाही.

चौकशी समितीस साहित्याचा व कामाचा दर्जा कंपनीच्या निकषानुसार आढळून आला. चौकशी समितीस ज्या किरकोळ त्रुटी आढळून आल्या त्या त्रुटींचे निराकरण एजन्सीकडून करुन घेण्यात आले.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथे नासाच्या नावाने शेकडो लोकांची केलेली फसवणूक

**(१८) * ६१४२५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेडिओधर्मी धातू राइस पुलर भांडयाच्या उत्पादनात गुंतवणूक केल्यास मोठया प्रमाणात परतावा मिळेल असे आमिष दाखवून नासाच्या नावाने पुण्यातील शेकडो लोकांची किमान ६ कोटींची फसवणूक करण्यात आले असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी फसवणूक झालेल्या लोकांनी पुणे पोलीसांकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच असे प्रकार भविष्यात होऊ नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

प्रस्तूत प्रकरणी आरोपींनी त्यांच्याकडील राइस पुलर यंत्रामधून निर्माण होणाऱ्या रेडीएशनच्या उपयुक्ततेमुळे नासा या संशोधन संस्थेकडून आरोपींना मोठी रक्कम मंजूर झाली असून त्यापैकी काही रक्कम विना परतावा असुरक्षित कर्ज स्वरुपात वाटप करावयाची आहे असा आभास निर्माण केला. त्याकरिता आरोपींनी फाऊंडेशनची स्थापना करून त्याचे सभासदत्व व करार खर्चासाठी गुंतवणूक केल्यास मोठया प्रमाणात परतावा मिळेल असे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे येथे दि.३१.०१.२०२३ रोजी गु.र.नं. ४७/२०२३ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२०ब, ३४ व महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम (MPID), १९९९ कलम ३, ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्ह्यामध्ये आतापर्यंत झालेल्या तपासात चार आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असुन गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(४) आर्थिक फसवणुकीच्या प्रकारांना आळा घालण्याच्या अनुषंगाने गुन्ह्यांचा जलद तपास करून आरोपींना कठोर शिक्षा देण्याच्या उद्देशाने गुन्ह्यांची नोंद होताच तात्काळ कारवाई करण्यात येते. तसेच सर्वसामान्य नागरिक फसवणूकीच्या गुन्ह्यांना बळी पडू नयेत याकरिता पोलीस प्रशासनामार्फत संकेतस्थळाद्वारे व प्रसिद्धीमाध्यमांद्वारे जनजागृती करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर येथे धारीवाल वीज प्रकल्पाच्या जलाशयामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(१९) * ६२१९९ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील धारीवाल कंपनीच्या वीज प्रकल्पाच्या जलाशयामुळे नुकसान झालेल्या २८ शेतकऱ्यांना ६२ लाख रुपये नुकसान भरपाई द्यावी असा जिल्हा प्रशासनाने अहवाल तयार करुनही नुकसान भरपाई अदा करण्याची सुचना अद्यापही दिलेली नसल्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धारीवाल कंपनीला नुकसान भरपाईबाबतचे अधिकृत पत्र मिळालेले नसतानाही त्यांचेकडून अहवालावर आक्षेप नोंदविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावरुन प्रशासनाच्या भूमिकेबाबत संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मौजा येरुर ता. चंद्रपूर येथे धारीवाल कंपनीकडुन निर्माण करण्यात आलेले पाण्याचे टाके/जलाशय परिसरात जलाशयातून पाझर निर्माण होऊन अवतीभवतीच्या एकूण २८ शेतकऱ्यांच्या शेतजमिनीच्या पिकांच्या होणाऱ्या नुकसानी संदर्भात दि. १३.१२.२०२२ व दि. १४.१२.२०२२ रोजी तलाठी व कृषी सहायक यांच्याद्वारे स्थळ पाहणी करण्यात आली व पीक नुकसानीचे रितसर पंचनामे करण्यात आलेले आहेत व त्यानुसार एकूण २८ शेतकऱ्यांना त्यांच्या शेतपिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत तसेच जमीन पडीत राहिल्यामुळे नुकसान भरपाई ची रक्कम निश्चित करण्यात आलेली होती. तथापि सदर नुकसान भरपाईस धारीवाल इन्फ्रा लि. यांनी आक्षेप घेतला होता. त्यानुसार अतिरिक्त जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या दालनात दि. १८.०१.२०२३ रोजी सभा घेतली असुन सदर सभेतील दिलेल्या निर्देशानुसार तालुका कृषी अधिकारी, चंद्रपूर यांनी दि. २३.०२.२०२३ रोजी सुधारित मुल्यांकन अहवाल तहसिलदार, चंद्रपूर यांच्याकडे सादर करुन सदर अहवालानुसार निर्धारित केलेल्या नुकसान भरपाईच्या मुल्यांकन अहवालावर बाधित २६ शेतकऱ्यांनी त्यांचा लेखी आक्षेप दि.०२.०३.२०२३ रोजी तहसिलदार, चंद्रपूर यांच्याकडे सादर केलेला आहे. त्यानुसार मुल्यांकनाबाबतची तपासणी व आक्षेपावरील सुनावणीची प्रक्रिया पुर्ण करुन त्याबाबतचा अहवाल तहसिलदार चंद्रपुर यांच्याकडुन जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यावर पुढील कार्यवाही नियोजित आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पांतर्गत बाधित कुटुंबांच्या पुनर्वसनाबाबत

**(२०) * ५७२६६ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीवर गोसीखुर्द सिंचन प्रकल्पासाठी भंडारा जिल्ह्यातील ३१ व नागपूर ५४ अशा ८५ गावातील नागरीकांच्या जमिनी संपादीत करण्यात आल्या असून सन १९९५-९६ च्या अंतिम निवाडयानुसार सुमारे १४ हजार पेक्षा अधिक कुटुंब विस्थापित झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्प बाधित शेतकऱ्यांच्या ज्यावेळेस जमिनी संपादित करण्यात आल्या त्यावेळी त्यांची नावे मतदार यादीत नव्हती तसेच त्यांचेकडे रेशनकार्ड, घरभाडे पावती, विदयुत देयक इत्यादी कागदपत्रे नसल्यामुळे अद्यापही त्यांना

नविन भूखंड देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुनर्वसन झालेल्या गावठाणातील नागरीकांना रस्ते, पाणी, वीज स्मशानभूमी, शाळा इमारत, ग्रामपंचायत भवन, अंगणवाडी इमारत इत्यादी सुविधांची कामे अद्यापही अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गोसेखुर्द प्रकल्पग्रस्त वाढीव कुटूंबाचे ग्रामपंचायती अंतर्गत सर्वेक्षण करून भंडारा-नागपूर जिल्ह्यात २११८४ वाढीव कुटुंबांकरीता ६१४.३४ कोटी रुपयांची तरतूद करण्याकरीता शासनास दिनांक२३ जानेवारी २०२१ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
गोसीखुर्द प्रकल्पामुळे नागपूर जिल्हयातील ५१ व भंडारा जिल्हयातील ३४ असे एकूण ८५ गावे बाधित होत आहे.
नागपूर जिल्हयातील (८३४८ कुटुंब) व भंडारा (६६३६ कुटुंब) जिल्हयातील असे एकूण १४९८४ कुटुंब बाधित होत आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

नागपूर जिल्ह्यातील ५१ प्रकल्पग्रस्त गावातील लोकांना पर्यायी गावठाणात आतापर्यंत ७८४६ भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे.काही बाधित कुटुंबाच्या मागणीनुसार भूखंडाऐवजी रक्कम रु. ५०,०००/- इतका लाभ देण्यात आलेला आहे.

भंडारा जिल्ह्यातील ३४ गावे बाधित होत असून बाधित गावठाणातील असलेल्या ५२७७ बाधित कुटुंबांना पर्यायी गावठाणात भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे.

ज्या प्रकल्पग्रस्त लोकांची स्वतंत्र भूखंडाची मागणी असते, अशा प्रकरणात संबंधित उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत तपासणी करुन व अर्जदारास त्यांचे म्हणणे पुराव्यासहीत सादर करण्याची संधी देवून जिल्हा गाऱ्हाणे निराकरण समितीमार्फत अशी प्रकरणे नियमानुसार निकाली काढण्यात येतात.
(३) अंशत: खरे आहे.
गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत जि. नागपूर येथील ३६ पर्यायी गावठाणांपैकी ३५ पर्यायी गावठाणात १८ नागरी सुविधांची कामे पूर्ण आहेत. जि. भंडारा येथील २७ पर्यायी गावठाणांपैकी २५ पर्यायी गावठाणात १८ नागरी सुविधांची कामे पूर्ण आहेत. उर्वरीत रुयाड जि.नागपूर, मौजा-नेरला व खापरी रे.जि. भंडारा येथे नागरी सुविधांची कामे भूसंपादन, प्रशासकीय मान्यता घेऊन करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) व (५) हे खरे आहे.
(६) सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनावर निर्माण होणाऱ्या अतिरिक्त भाराबाबत अभिप्रायार्थ मदत व पुनर्वसन विभागास प्रस्ताव सादर करण्यास आला होता. त्यावर महसूल व वन विभागाने शासनावर रु. ६१४.३४ कोटीचा आर्थिक भार निर्माण होणार असून याबाबत मा. मंत्री(मदत व पुनर्वसन ) यांचे बैठकीतील इतिवृत्ताप्रमाणे मा. मंत्री (वित्त) व मा मंत्री (जलसंपदा) यांची एकत्रित बैठक घेवून निर्णय घेणेबाबत सूचित केले आहे. त्याप्रमाणे बैठक घेण्याचे नियोजित असून होणाऱ्या निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

-----------------

## राज्यातील सायबर गुन्हेगारांनी पुस्तकविक्री करणाऱ्या नामांकित दुकानांच्या नांवाने बनावट संकेतस्थळ तयार करुन केलेला गैरव्यवहार

**(२१) * ६२५८७ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय**

**जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सायबर गुन्हेगारांनी विद्यार्थ्यांना आपले लक्ष्य केले असून पुस्तकविक्री करणाऱ्या राज्यातील नामांकित दुकानांच्या नावाने बनावट संकेतस्थळ तयार करुन विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात पालक अथवा विद्यार्थ्यांनी अशाप्रकारे २६०० पेक्षा जास्त पुस्तकांची ऑनलाईन खरेदी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) पुस्तकविक्री करणाऱ्या राज्यातील नामांकित दुकानाच्या नांवाने बनावट संकेतस्थळ तयार करुन आर्थिक फसवणूक करण्यात येत असल्याबाबत तक्रार राज्य पोलीसांकडे प्राप्त झाल्याचे दिसुन आले नाही.

तथापि भविष्यात तक्रार प्राप्त झाल्यास कायदेशीर कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जळगाव जिल्ह्यातील जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयात झालेला गैरव्यवहार**

**(२२) * ५८४५९ श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात जात वैधता पडताळणीची हजारो प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी निकाली काढण्याकरिता संबंधितांकडून लाच मागण्यात येत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयात १० लाख रुपयांची मागणी करणाऱ्या तीन शासकीय कर्मचाऱ्यांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत तसेच दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही. जळगाव जिल्ह्यातील १२९२ प्रकरणे सद्या प्रलंबित आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) होय हे खरे आहे. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, धुळे येथील श्री. अनिल रमेश पाटील, कनिष्ठ लिपीक व श्री.निलेश भागचंद अहिरे, वरिष्ठ संशोधन अधिकारी तसेच आरोग्य विभाग, जिल्हा परिषद कार्यालय नाशिक येथील श्री.राजेश भगवान ठाकूर, वरिष्ठ सहाय्यक या तिघांवर जळगांव लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडून दि.३०/१२/२०२२ रोजी धुळे शहर पोलिस स्टेशन येथे गु.र.नं.७५१/२०२२ अन्वये लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ अंतर्गत कलम, अ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्यांच्या अनुषंगाने श्री.अनिल रमेश पाटील यांना अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांचेकडील आदेश/आस्था/विची-२०२३/प्र.क्र./का-२(५)/१६४ दि.०६/०१/२०२३ अन्वये सेवेतून निलंबित केले आहे. तसेच श्री. निलेश भागचंद आहिरे यांना अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.आस्था-११२३/प्र.क्र.७/का.१५, दि.१२ /०१/२०२३ अन्वये सेवेतून निलंबित केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली-मिरज येथे दिव्यांग असल्याची बोगस वैद्यकीय प्रमाणपत्रे मिळवून शासकीय योजनांचा लाभ घेतल्याबाबत

**(२३) * ६१८९० श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली-मिरज येथे दिव्यांग असल्याची बनावट वैद्यकीय प्रमाणपत्रे मिळवून शासकीय योजनांचा लाभ घेतल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शाासकिय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांनी पोलिस अधिक्षकांकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीअंती दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सांगली-मिरज येथे दिव्यांग असल्याची बनावट कागदपत्रे तयार करुन शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी वापरल्याची घटना घडली आहे, प्रत्यक्षात लाभ घेतल्याचे आढळून आले नाही.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाणे, सांगली येथे दिनांक १८.०१.२०२३ रोजी गु.र.क्र. २०/२०२३, भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये १० आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथे बनावट दस्तऐवजाचा वापर करुन मिळकत स्वत:च्या नावावर केल्याबाबत

**(२४) * ६२९४७ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील गंगापूर पोलीस स्टेशन हद्दीतील मिळकतीवर मुळ मालकाच्या बनावट स्वाक्ष-या व दस्ताऐवजाचा वापर करुन ६ कोटी रूपयांची मिळकत स्वत:च्या नावावर केल्याचे माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोपींनी मुळ मुखत्यारपत्रावर बनावट स्वाक्षरीद्वारे फसवणुक केल्याने बबली अमित सिंग आनंदवल्ली, नाशिक यांनी गंगापूर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय,

सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार गंगापूर पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे दिनांक ०८.०२.२०२३ रोजी गु.र.नं. ३४/२०२३, भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील एका विकासकाने सामंजस्य करारावर बनावट स्वाक्षऱ्या करून केलेल्या गैरव्यवहार

**(२५) * ६२९१६ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विकासक श्री.मोहम्मद लोखंडवाला यांनी सामंजस्य करारावर श्री.साबिर रशिद यांच्या बनावट सह्या करुन श्री.फैजल रशिद यांचे संमती शिवाय मिनर्व्हा प्रकल्प, महालक्ष्मी येथील त्यांच्या मालकीचे १८ कोटी रुपये किंमतीचे दोन फ्लॅट आयडीबीआय व एडलवाईज कंपनीकडे कर्जाच्या बदल्यात गहाण ठेवून फसवणूक केल्याचे पोलीस सहआयुक्त, आर्थिक गुन्हे, मुंबई यांच्या चौकशी अहवालात माहे नोव्हेंबर २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी श्री.साबिर रशिद यांनी मा.उपमुख्यमंत्री, वने मंत्री, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-३), मुंबई वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वरळी पोलीस स्थानक यांच्याकडे माहे डिसेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार अर्ज दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विकासकाशी आर्थिक देवाणघेवाण करुन विकासकाविरुद्ध वरळी पोलीस स्थानकाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकामार्फत गुन्हा दाखल करुन चौकशी करण्यात जाणीवपूर्वक दिरंगाई करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधित दोषी विकासकावर गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करणाऱ्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वरळी पोलीस स्थानक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्यामार्फत केलेल्या प्राथमिक चौकशीवेळी तक्रारदाराने सादर केलेल्या कागदपत्रांवरुन माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये सदरची बाब निदर्शनास आलेली आहे.

(२) होय.

(३) हे खरे नाही.

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदाराने दिनांक १४/१२/२०२२ रोजी वरळी पोलीस ठाणे, मुंबई येथे तक्रार दिली होती. सदर तक्रार अर्ज चौकशीसाठी वरळी पोलीस ठाणे, मुंबई यांचेमार्फत तक्रारदार यांना उपस्थित राहण्याबाबत वेळोवेळी कळविण्यात आले होते. तसेच तक्रारदार यांचे वकील यांनी वरळी पोलीस ठाणे, मुंबई येथे तक्रारदार अर्ज चौकशीस येणार असल्याचा जबाब नोंदवूनही तक्रारदार अर्ज चौकशीसाठी उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे पोलीसांमार्फत चौकशी करण्यास दिरंगाई करण्यात आली नाही.

तद्नंतर सदर अर्जातील आर्थिक फसवणूकीची तक्रार दहा कोटी रुपये पेक्षा जास्त असल्याकारणास्तव वरळी पोलीस ठाणे, मुंबई यांनी सदर तक्रार अर्ज पुढील चौकशीसाठी दि.२७/०२/२०२३ रोजी आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे वर्ग केला असून आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांचमार्फत पुढील चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर येथे शासकीय कार्यालयाशी संबंधित दोन बँक खात्यातील रकमेत झालेला गैरव्यवहार

**(२६) * ५९३७१ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथे शासकीय कार्यालयाशी संबंधित दोन बँक खात्यातील २२ कोटी ८७ लाख ६२ हजार २५ रुपयांच्या रकमेचा अपहार एका अव्वल कारकून दर्जाच्या कर्मचाऱ्याने केल्याची बाब दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबधित प्रकरण हे सन २०१५ ते २०२२ असे एकूण सात वर्षांतील असून याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयातील एका तत्कालिन लिपिकासह चार जणांविरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आहरण व संवितरण अधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांनी बँकेचे स्टेटमेंट प्रत्येक महिन्याला तपासणे आवश्यक असताना या कालावधीत एकदाही रकमेची पडताळणी अथवा ताळमेळ (रि-कन्सीलीएशन) केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित प्रकरण हे जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत निधीबाबत असून केवळ एका कारकून दर्जाच्या कर्मचाऱ्यांपुरती ही कारवाई मर्यादित न ठेवता आहरण व संवितरण अधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, या प्रकरणाची विशेष पथकामार्फत संपुर्ण चौकशी करून संबंधित सर्व दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथील तत्कालीन अव्वल कारकून यांच्यासह ४ जणांविरुध्द एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे दि.२१.०१.२०२३ रोजी गु.र.नं. ४३/२०२३ भा.द.वि कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४६९,४७१, ४७४, ४७७, ४७७ (अ), ४०९, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) व (४) लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसिलदार (सर्वसाधारण) हे आहरण व संवितरण अधिकारी असून त्यांनी सदर कालावधीत कार्यालयीन खात्या मधील रकमेची पडताळणी अथवा ताळमेळ करणे आवश्यक होते. परंतु तसे केले नसल्यामुळे सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, लातूर यांनी त्यांच्या स्तरावर लेखाधिकारी यांचे पथक नेमून कार्यालयीन खात्याचे लेखापरिक्षण केले.

लेखापरिक्षणांतर्गत निर्दशनास आलेल्या बाबींवरून एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास चालु आहे.

तसेच शासकीय कामकाज करताना सतर्कता न बाळगणे व प्रभावि नियंत्रण न ठेवल्याबाबत संबंधित तहसीलदार (सर्वसाधारण) तथा आहरण व संवितरण अधिकारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित असुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, लातुर यांचेकडे देण्यात आला असून तपास सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शिवरे (ता.चांदवड, जि.नाशिक ) येथील गावात विधवा महिलेची काढलेली धिंड**

**(२७) * ६१८६२ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवरे (ता.चांदवड, जि.नाशिक) येथे पतीच्या दशक्रिया विधीसाठी गेलेल्या विधवा महिलेचे तिच्या सासरच्यांनी व गावातील अन्य लोकांनी तोंडाला काळे लावुन चपलांचा हार घालून गावातून तिची धिंड काढल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिलेच्या पतीचे निधन हे आत्महत्या नसून घातपात असल्याची तक्रार महिलेने केल्याने हा प्रकार घडला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी काही महिलांविरोधात गुन्हा दाखल केला असला तरी अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय

(२) हे खरे नाही,

सदर पिडीत महिलेल्या पतीने आत्महत्या केलेली नसुन त्यांचा घातपात झाला आहे या प्रकारची कोणतीही तक्रार पिडीत महिलेने दिलेली नाही. पिडीतेच्या पतीने आत्महत्या केल्याबाबत पिडीतेच्या सासूने दिलेल्या फिर्यादीवरुन वडनेर भैरव पोलीस ठाणे येथे दि.२५.०१.२०२३ रोजी गु.र.क्र.१८/२०२३, भा.दं.वि.कलम ३०६,५०४,५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) व (४) पिडीत महिलेच्या तक्रारीवरुन वडनेर भैरव पोलीस ठाणे येथे दिनांक ३१.०१.२०२३ रोजी गु.र.क्र.२६/२०२३ अन्वये भा.दं.वि. कलम ३५५, ३२३, १४३,१४७,१४९,५०४ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(३) चे उल्लंघन १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर आरोपीत महिलांना सीआरपीसी कलम ४१(अ) (१) प्रमाणे नोटीस देण्यात आली असून तपास पुर्ण करुन दिनांक २८.०२.२०२३ रोजी मा.न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील नागपाडा भागातील एका शाळेच्या मुख्याध्यापकाने**
**अल्पवयीन विद्यार्थिनीवर केलेला अत्याचार**

**(२८) * ५९५३१ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईतील नागपाडा भागातील एका शाळेच्या मुख्याध्यापकाने अल्पवयीन विद्यार्थिनीला धमकावून अत्याचार केल्याची घटना दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शाळेतील आरोपी मुख्याध्यापक फरार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस : (**१) सदर गुन्ह्यातील आरोपी हा शाळेचा संस्थाचालक आहे.
(२) सदर गुन्ह्यातील आरोपी फरार असून शोध सुरु आहे.
(३) सदर प्रकरणी नागपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ९९/२३ कलम ३७६ (२) (एफ), ३७६ (३), ३५४, ५०६ भा दं. वि. सह कलम ४, ८,१२ लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये दि.२२.०१.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात आरोपीचा शोध घेण्यात येत असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.